भारतीय जनता पक्ष
(केंद्रीय कार्यालय)
11, अशोक रोड, नवी दिल्ली-01
फोन नं.-011-23005787, फॅक्स-011-23005787

दि.-29 जानेवारी,2014

भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते, डॉ. सुधांशु त्रिवेदी यांची पत्रकार परिषदेतील मुख्य अंश

युपिए सरकारने ज्याप्रकारे कुशासन आणि चुकीची नीति अवलंबिली आहे त्यामुळे सर्वसामान्य जनता आणि समाजातील भिन्न भिन्न वर्गांमध्ये फक्त समस्यांचा सामना करावा लागत आहे एवढेच नाही तर त्यामुळे जनतेमध्ये निराशा जनाक्रोश वाढत आहे. आज विज्ञान भवन मध्ये पंतप्रधान यांच्या भाषणादरम्यान जे काही घडले हे तेच निराशा आणि जनाक्रोशाचे प्रतिबिंब म्हणता येईल.

हा आक्रोश अधिक वाढत जात आहे कारण ज्याप्रकारे युपिए सरकारच्या माध्यमातून मिडिया चॅनेल मध्ये जाहिराती दिल्या जात आहेत, हीं सरकारची असंवेदनशीलता आणि राजवंशीय शैलीच्या आत्म प्रशंसेला दर्शवतो.

आपल्याला लक्षात असेल की, याच विज्ञान भवनात 2008 साली मा.पंतप्रधान यांनी असे सांगितले होते की, देशाच्या संसाधनांनर पहिला अधिकार मुस्लिमांचा आहे. मा. पंतप्रधान यांचे हे वक्तव्य मोठे सांप्रदायिक आणि विवादित होते. मात्र आज 6 वर्षानंतर अल्पसंख्यकांची जी परिस्थिती झाली ती त्याच प्रती आक्रोशाचे उदाहरण आहे. त्यामुळे सामान्य जनता आणि अल्पसंख्याक समुदाय आपली फसवणूक झाली असल्याचे समजत आहे.

युपिए सरकार द्वारे अल्पसंख्यकांसाठी आतापर्यंत अनेक मोठ मोठी वचने आणि योजना बनविण्यात आली. मला यात सखोलपणे जायचे नाही मात्र काही बाबींवर नजर टाकतो.

1. संसदेची Social Justice & Empowerment ची स्थायी समितीचा रिपोर्ट जो मे 2013 मध्ये प्रस्तुत करण्यात आला त्यात हे स्पष्टपणे उघड होते की, सामाजिक न्याय-शिक्षा, स्वास्थ्य इत्यादि लक्षात घेऊन जे लक्ष ठरविण्यात आले आहे त्यापेक्षा खुप कमी लक्ष गाठले आहे. अल्पसंख्यक मंत्रालयाला वाटण्यात आलेले 3135 करोड रुपायांच्या बजेट मधून 969 करोड रुपये अर्थात सुमारे 30 टक्के खर्चच झाले नाहीत.

युपिए सरकार द्वारे वोट बँकेसाठी अल्पसंख्यकांच्या उद्धारासाठी जी सच्चर कमिटी स्थापन करण्यात आली होती आणि जी रिपोर्ट आली ती अल्पसंख्यकांच्या मागासपणाच्या स्थितीला दर्शवते. अखेर यास जबाबदार कोण आहे? काय 6 वर्षाचा एनडीए सरकारचा कार्यकाल की, 56 वर्षाचा कॉग्रेसचा कार्यकाल?

देशातील सामान्य जनता हे जाणू इच्छिते की, अल्पसंख्यकांची जी दयनीय स्थिती आज आहे त्याला जबाबदार कॉग्रेसचा 60 वर्षांचा कार्यकाल आहे की एनडीए चा 6 वर्षांचा कार्यकाल.

2. आज ज्याप्रकारे लखनौ मध्ये उत्तर प्रदेशातील अखिलेश सरकारद्वारे आंदोलन करणारे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करण्यात आला त्याला भारतीय जनता पक्ष कडक शब्दात निषेध करित आहे.

(श्री अरुण कुमार जैन)

कार्यालय सचिव